**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

( माननीय सभापती आसनस्थ होताच दोन्ही बाजूचे
सन्माननीय सदस्य घोषणा देण्यास सुरुवात करतात.)

**सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्याबाबत**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अतिशय महत्वाचा असा प्रश्नोत्तराचा तास सुरु होत असताना सभागृहात मात्र एकही कॅबिनेट मंत्री महोदय उपस्थित नाही.

**सभापती** : ठीक आहे. मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 2.00 ते 2.10 पर्यंत स्थगित झाली.)

-----

नंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSK/ KGS/ MHM यापूर्वी श्री. बोर्डे .. 14.05

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

( दोन्ही बाजूंचे सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने घोषणा देत असतात. )

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. आजच्या दिवसाचे कामकाज सुरु होतानाच या ठिकाणी कॅबिनेट मिनिस्टर उपस्थित नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज 10 मिनिटे स्थगित करण्यात आले आणि त्यामुळे कामकाजाचा तेवढा वेळ वाया गेला. मला असे वाटते की, याबाबत कॅबिनेट मिनिस्टर यांनी दिलगिरी व्यक्त करणे आवश्यक आहे आणि यानंतर त्या संदर्भातील संकेत पाळणे गरजेचे आहे. तरी, सदनामध्ये अचूक वेळी उपस्थित राहण्याच्या दृष्टीने नोंद घेण्यात यावी.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, नोंद घेण्यात येईल.

**नियम 289 अन्वयेच्या सूचनेबाबत**

**सभापती** : आज या ठिकाणी नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या दोन सूचना आहेत. त्यातील पहिली सूचना सरदार सरोवर प्रकल्पासंदर्भात असून दुसरी सूचना, महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नाबाबत आहे. मी पहिल्या सूचनेच्या अनुषंगाने असे सांगेन की, आजच्या कामकाजपत्रिकेवर याबाबतीत कोणताही विषय नाही. त्यामुळे मी नियम 289 अन्वयेच्या या प्रस्तावाला अनुमती नाकारित आहे. मात्र प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर आवश्यक असल्यास याबाबतीत मी दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांना 10-15 मिनिटे आपले विचार मांडण्यासाठी देईन. नियम 289 अन्वयेच्या दुसऱ्या प्रस्तावासंबंधी मी असे सांगेन की, तो प्रश्न अत्यंत जिव्हाळ्याचा व महत्वाचा असा प्रश्न आहे. जवळजवळ 48 ते 50 वर्षे आपण सर्वजण या प्रश्नाकरिता सातत्याने झगडत आहोत. महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील आपल्या बांधवांना बरोबर घेण्यासाठी आपला हा लढा सातत्याने निकराने सुरु आहे. जरी मी हा प्रस्ताव नाकारण्याबाबत सांगितले असले तरी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांना तसेच दोन्ही बाजूंच्या काही सन्माननीय सदस्यांना या संदर्भात आपले विचार मांडण्याकरिता परवानगी देत आहे.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, बेळगांव, कारवार, निपाणी व काही इतर खेडी या संदर्भातील हा प्रश्न सन 1956 पासून सुरु आहे. आज या प्रश्नाला जवळजवळ 50 वर्षे झाली आहेत. सभापती महोदय, संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती दिनांक 1 मे, 1960 रोजी झाली. सभापती महोदय, संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यापासून या आंदोलनाला नवीन स्वरुप प्राप्त झाले आहे. बेळगांव, कारवारमधील जनता महाराष्ट्रामध्ये येण्यासाठी खूप उत्सुक आहे. महानगरपालिकेची निवडणूक असेल, नगरपरिषदेची निवडणूक असेल किंवा अन्य दुसरी कोणतीही निवडणूक असेल त्यामधून स्थानिक जनतेने लोकशाहीच्या माध्यमातून अनेक वर्षे सातत्याने लढा दिला आहे. सभापती महोदय, आपण सतत लोकशाही, लोकशाही असे म्हणतो, परंतु या राज्यात लोकशाहीमध्ये दिलेल्या हक्कांची पायमल्ली होत आहे. या प्रश्नासंदर्भात आम्ही मुंबईमध्ये देखील खूप आंदोलने केली आहेत. मला आपल्याला सांगताना अतिशय दु:ख होत आहे की, यामध्ये लहान-लहान मुले देखील मारली गेली आहेत. सन 1970 मध्ये बेळगांव, कारवार यांचा महाराष्ट्रामध्ये समावेश होण्यासाठी मुंबई शहरात एक मोठा लढा देण्यात आला. त्यावेळी 69 व्यक्तीं हुतात्मे झाले. यामध्ये त्यांचा काय दोष होता ? आमची एवढीच मागणी होती की, बेळगांव, कारवार या सीमावर्ती भागांचा महाराष्ट्रामध्ये समावेश व्हावा.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ KGS/ MHM/ प्रथम श्री. कांबळे... 14:10

श्री. मधुकर सरपोतदार...

एकदा भाषेच्या आधारावर देशाची प्रांतरचना करण्याचे ठरल्यानंतर महाराष्ट्राचा हक्क का डावलण्यात येत आहे असा आमचा प्रश्न आहे ? महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागामध्ये जे मराठी भाषिक आहेत त्यांना महाराष्ट्रामध्ये येऊ द्या व कन्नड भाषिकांना आपण तिकडे घ्यावे. अशा प्रकारची मागणी माननीय राज्यपाल श्री. पाटसकर यांच्या निवाडयामध्ये होती. अशा प्रकारे न्याय देण्याची मागणी आम्ही त्यावेळी केली होती. सीमाप्रश्नांच्या संदर्भात अनेक लोक तुरुंगात गेले, काही लोक कर्नाटकच्या तुरुंगात सुध्दा गेलेले आहेत. मराठी भाषिकांवर मोठया प्रमाणात अन्याय होत आहे, कर्नाटक राज्य मराठी भाषिकांना द्वेषभावनेची वागणूक देत आहे, अनेक प्रकारचे अन्याय मराठी भाषिकांवर करण्यात येत आहेत, मी व शिवसेना प्रमुख माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे आम्ही त्या भागामध्ये निवडणुकीच्या प्रचारासाठी गेलो होतो तेव्हा तेथील लहान मुले आम्हाला सांगत होते की, आमच्या उमेदवारांना मते द्या, हे मागण्यासाठी आपण येऊ नका. तेथील मराठी भाषिक मुलांवर शाळेमध्ये कन्नड भाषा शिकण्याची सक्ती करण्यात येते. नोकरीमध्ये कन्नड भाषिकांना प्राधान्य देण्यात येते, कन्नड भाषा येत असेल तरच नोकरी, अशा प्रकारचे विविध अन्याय तेथील मराठी भाषिकांवर करण्यात येत आहेत. आज तेथील जनतेची अतिशय कठीण अशी परिस्थिती आहे, तेथील जनता आता कंटाळलेली आहे. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये 8 डिसेंबर, 2005 रोजी सर्वपक्षीय सदस्यांनी महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नांच्या संदर्भात एक प्रस्ताव आणला होता. त्यावर सर्वपक्षीय सदस्यांनी भाषणे केली होती, त्यावेळी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या प्रस्तावास समर्थन दिले होते. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री काय बोलेले होते ते मी थोडक्यात वाचून दाखवितो. " सीमा भागातील मराठी माणसाला या सदनातून असा संदेश गेला पाहिजे की, तुम्ही एकटे नाहीत. सारा महाराष्ट्र तुमच्या पाठीशी उभा आहे. ही विश्वासाची भावना त्यांच्यामध्ये निर्माण व्हावी आणि आम्ही सगळे त्याच जिद्दीने तुमच्या मागे उभे आहोत असा विश्वास या ठरावाच्या निमित्ताने त्यांना दिला पाहिजे, ज्या पध्दतीने त्या ठिकाणी दहशत निर्माण झाली आहे, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे, मराठी भाषिकांवर अन्याय केला जात आहे, त्या लोकांना संरक्षण मिळाले पाहिजे. परवा दिल्लीला माननीय गृहमंत्र्यांची भेट घेतली आणि त्यांना विनंती केली की, आपण दोन्ही राज्याच्या मुख्यमंत्र्यांना बोलवावे आणि कोणत्याही पध्दतीने कायदा

......2......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, मराठी भाषिकांच्या हक्कांचे रक्षण केले जाईल, अशा पध्दतीचे स्पष्ट आश्वासन त्या राज्यातील मुख्यमंत्र्यांनी मराठी भाषिकांना देण्याची गरज आहे. आणि ते देण्याच्या संदर्भात आपण चर्चा घडवावी अशी मी त्यांना विनंती केली आहे. ती विनंती त्यांनी मान्य केलेली आहे. माननीय पंतप्रधानांनाही आम्ही विनंती केली आहे. सीमा भागातील जे प्रमुख नेते आहेत त्यांच्यासह सर्वपक्षीय शिष्टमंडळाने एकदा माननीय पंतप्रधानांकडे जाऊन या परिस्थितीचे गांभीर्य त्यांच्या कानी घालावे आणि त्यांनी वेळीच हस्तक्षेप करावा. तसेच लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या ज्या संस्था आहेत त्या संस्थेमध्ये एखादा ठराव झाला असेल तर ती संस्था बरखास्त करण्याची टोकाची भूमिका घेणे हे लोकशाहीच्या विरोधात आहे, ही भूमिका आम्ही त्यांनाही कळविलेली आहे. ताबडतोबीने त्यांनी या शिष्टमंडळाला भेटण्यासाठी वेळ द्यावा अशी विनंती केलेली आहे." माननीय मुख्यमंत्री महोदयांचे सर्व भाषण मी वाचून दाखवित नाही, परंतु अशी परिस्थिती आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांचेही हेच मत आहे. त्यावेळी बेळगावच्या महापौरांना प्रत्यक्षात पकडून मंत्रालयात जाऊन तेथील कन्नड लोकांनी त्यांच्या तोंडाळा काळे फासले होते, त्यांचा अवमान केलेला आहे, पराकोटीचा अवमान केलेला आहे. त्याच वेळी सीमा भागातील कोल्हापूर परिसरामध्ये मोठया प्रमाणात दंगल झाली होती. अशा परिस्थितीत लोकांच्या जीवनाशी, लोकांच्या भावनेशी खेळ करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. तेथील लोकांच्या जीवनमरणाचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे.

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ....

जवळजवळ 48-49 वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित आहे. बेळगावचे हजारो लोक आज आझाद मैदानावर आलेले आहेत. सीमाप्रश्न मार्गी लागावा अशी त्यांची इच्छा आहे. आम्ही सकाळी त्यांना भेटण्यासाठी गेलो असता त्यांनी आम्हाला सांगितले की, यासाठी आम्हाला जे काही करायला लागेल ते आम्ही करायला तयार आहोत. हा प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही पंतप्रधानाच्या पातळीवर सुध्दा प्रयत्न करण्यासाठी तयार आहोत. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले असल्यामुळे त्याचे पुढे काय होईल ? याची माहिती नाही. आज बेळगावच्या लोकांवर तेथील स्थानिक राज्यकर्त्यांकडून अन्याय होत आहे, तो थांबवला पाहिजे. तेथील जनतेवर होत असलेला अन्याय थांबवण्यासासाठी महाराष्ट्र शासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. हा प्रश्न सोडवण्यासाठी त्यांचे एक शिष्टमंडळ आले आहे. या शिष्टमंडळाला माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री यांनी भेटून त्यांना मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे. तसेच या प्रश्नाच्या संदर्भात संपूर्ण महाराष्ट्र आपल्या पाठीशी असल्याचे नागपूरच्या अधिवेशनामध्ये आश्वासित करण्यात आले होते. त्यावेळी दिलेले आश्वासन प्रत्यक्षात कृतीत आणण्याची आवश्यकता आहे. याकरीता महाराष्ट्र शासनाने तेथील जनतेला दिलासा देण्याची गरज आहे. सभापती महोदय, जेथे राज्य आहे, तेथे अनेक प्रश्न असतात, या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे काम लोकप्रतिनिधी करीत असतात. हे काम आम्ही करत आहोत. परंतु हा सर्व लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे, हा प्रश्न सोडवण्यासाठी आपण सर्वांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. म्हणून माझी सभापती महोदयांना विनंती आहे की, प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यात यावा व या विषयावर चर्चा घेऊन काहीतरी मार्ग काढावा.

**सभापती** : मी अजून प्रश्नोत्तराचा तास तहकूब केलेला नाही. विशेष बाब म्हणून या विषयासंदर्भात आपले विचार व्यक्त करण्यासाठी काही सन्माननीय सदस्यांना वेळ दिला आहे. या संदर्भात त्यांनी आपले विचार मांडावेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या सदनाचे ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन सीमाप्रश्नावर चर्चा घेण्यासंदर्भात आपले विचार व्यक्त केलेले आहेत. आज आझाद मैदानावर बेळगाव, निपाणी व कारवार येथून हजारोच्या संख्येने लोक आलेले आहेत. सीमाप्रश्न सुटावा म्हणून सर्व लोक धरणे धरुन बसलेले आहेत. सभापती महोदय,

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ KGS/ MHM/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे .... 14:20

श्री.पांडुरंग फुंडकर ....

हा विषय गेल्या 48 वर्षांपासून प्रलंबित आहे. तेथील लोकांना महाराष्ट्रात सामील व्हायचे आहे. या देशात भाषावार प्रांत रचना करीत असताना महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमेवरील जे मराठी भाषिक आहेत, त्यांचा समावेश महाराष्ट्रात का केला गेला नाही ? या प्रश्नाचे अजून आम्हाला उत्तर मिळत नाही. सभापती महोदय, हिंदुस्थानामध्ये वेगवेगळे प्रांत, वेगवेगळया भाषा असल्या तरी सर्व धर्म समभावाच्या माध्यमातून या देशाचा कारभार चालत असतो. परंतु त्या ठिकाणी असलेल्या मराठी भाषिक लोकांवर कन्नड भाषिक लोकांकडून अन्याय, अत्याचार केला जात आहे. मागच्या वर्षी बेळगाव महापौरांच्या तोंडाला काळे फासण्यात आले होते, त्यांना मारहाण करण्यात आली होती. अशाप्रकारे बेळगावच्या महापौरांचा अवमान करण्यात आला होता. यामुळे महाराष्ट्रात अतिशय उद्रेक झाला होता, त्यावेळी तेथील एक शिष्टमंडळ भेटण्यासाठी आले होते. त्याची रिॲक्शन म्हणून सर्वपक्षीय बैठक घेण्यात आली होती. या बैठकीमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांना संपूर्ण महाराष्ट्र आपल्या पाठीशी असल्याचे आश्वासित केले होते व त्याचबरोबर महाराष्ट्राच्यावतीने या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात केस दाखल करुन लढणार असल्याचे अभिवचन सुध्दा दिले होते. सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात केंद्र सरकारला आपले म्हणणे मांडण्यासाठी नोटीस दिली होती. परंतु सर्वोच्च न्यायालयाने नोटीस पाठवून 32 महिने होऊन सुध्दा केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात कोणतेही उत्तर सादर केलेले नाही. सभापती महोदय, सहनशिलतेला अंत असतो, गेल्या 50 वर्षांपासून तेथील लोक अन्याय सहन करीत आहे.

( यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

प्रत्येक अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित केला जातो आणि त्यावर त्याच त्या पद्धतीने उत्तरे दिली जातात. आता हा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे आणि सीमा भागातील मराठी जनतेवर अत्याचार वाढत चालले आहेत. महाराष्ट्रातील सर्व पक्षीय भावना अशी आहे की, हा मराठी भाषिक भाग महाराष्ट्रात सामील झाला पाहिजे. त्यासाठी या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घेण्याची गरज आहे, काही कृती करण्याची गरज आहे. आमची अपेक्षा हीच आहे की, या ठिकाणी या विषयी चर्चा झाली पाहिजे. कारण आज बेळगाव, कारवार, निपाणीचे लोक आपल्या राज्यामध्ये येऊन धरणे धरून बसले आहेत. अशा वेळी मनाचा मोठेपणा दाखवून या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि उपमुख्यमंत्र्यांनी तेथे जाऊन त्यांची भेट घेतली तर अख्खा महाराष्ट्र त्यांच्या पाठीमागे उभा आहे असा मेसेज सर्वदूर जाईल. म्हणून आजचे आपल्यापुढील सर्व विषय बाजूला सारून या विषयावर चर्चा येथे व्हावी आणि महाराष्ट्राचे मत या विधान परिषदेच्या माध्यमातून सर्व महाराष्ट्रामध्ये आणि कर्नाटकला देखील हा मेसेज गेला पाहिजे की, या लोकांच्या मागे संपूर्ण महाराष्ट्र आहे. म्हणून माझ ी या निमित्ताने विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उपमुख्यमुंत्री यांनी सीमा भागातील या शिष्टमंडळाची भेट येथे न घेता आझाद मैदानावर जेथे ते धरणे धरून बसले आहेत तेथे जाऊन त्यांची भेट घ्यावी आणि त्यांच्या मागे सारा महाराष्ट्र उभा असल्याचे त्यांना दाखवून द्यावे तसेच हा सीमा प्रश्न सोडविण्यासाठी एक निश्चित धोरण आणि काल मर्यादा ठरवून द्यावी अशी मी मागणी करतो.

***

..... इ 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, अत्यंत सौजन्यशील अशा या महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळ्याचा असलेल्या या सीमा प्रश्नाला आज पुन्हा तोंड फुटले आहे. हा विषय येथे चर्चेला येत असताना थोडीशी इतिहासाची पार्श्वभूमी आपण लक्षात घेतली तर समजून येईल की, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही बेळगावच्या एका अधिवेशनातूनच उभी राहिली. बेळगाव येथे झालेल्या साहित्य संमेलनामध्ये डांग, बिदर, निपाणी, कारवार आणि मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे असा ठराव संमत करण्यात आला. भाषावार प्रांत रचनेचा इतिहास आपणा सर्वांनाच माहिती आहे. परंतु महाराष्ट्राला रक्त सांडल्याशिवाय काही मिळत नाही ही परंपरा आहे. सभापती महोदय, मी या अधिवेशनाच्या माध्यमातून निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, 1956 च्या काळामध्ये श्री. पोटू नामलू या एका हुतात्म्याने आपल्या प्राणाचे बलिदान केले आणि आंध्र प्रदेश व तामिळनाडूला न्याय मिळाला. परंतु या महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र होण्यासाठी 105 हुतात्म्यांचे बळी गेले आणि मुंबई महाराष्ट्राची झाली पण अजून डांग, निपाणी हा मराठी भाषिक भाग या महाराष्ट्रात यावयाचा राहिला आहे. सभापती महोदय, मी कॉलेज जीवनामध्ये आलो तेव्हा एक मोठे आंदोलन या महाराष्ट्रात सीमा प्रश्नावरून पेटले होते. एका एका नेत्याने बेळगावला जायचे असे आंदोलन पेटविले होते. श्री. शरद पवार, श्री.छगन भुजबळ हे या आंदोलनातून तेथे गेले होते. त्यावेळचा प्रसंग सांगताना त्यांनी आम्हाला सांगितले की, माझ्या आजूबाजूला गोळीबारामध्ये दोन जण मृत्यूमुखी पडले. इतकी मोठी चळवळ त्यावेळेस उभी राहिली होती. आज तेथे पुन्हा अशीच भयानक परिस्थिती आहे. तेथील मराठी माणसाने जगायचे कसे ? आणि आपले अस्तित्व टिकवावयाचे कसे, आपली भाषा सांभाळावयाची कशी हा प्रश्न तेथील प्रत्येक मराठी माणसाला पडलेला आहे इतक्या त्याच्यासमोर अडचणी उभ्या केल्या गेल्या आहेत. तेथे पूर्वी अनेक सांस्कृतिक कार्यक्रमातून मराठी नाटके होत होती. परंतु आता तेथे मराठी नाटक वा मराठी सांस्कृतिक कार्यक्रम होऊ दिला जात नाही. अशा प्रकारे तेथे मराठीची गळचेपी होत आहे. पूर्वी निपाणी भागामध्ये 90 टक्के मराठी माणूस होता परंतु आता केंद्रीय कार्यालये आणून, शासकीय कार्यालये आणून जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात आहेत की, तेथील मराठी माणूस कमी होईल. अशा प्रकारे तेथे मराठी माणूस आणि मराठी भाषा मार खात आहे. अशा परिस्थितीत तेथील मराठी माणूस उभा राहण्यासाठी धडपडत आहे. एक संपूर्ण तरूण पिढी यामध्ये गेली. दोन तीन पिढ्या

...... इ 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आव्हाड .....

लढता लढता कामास आली आणि आज पुन्हा एक नवी पिढी तेथे उभी राहते आहे. तेथील मराठी महापौराचा अपमान झाला. आपल्या डोळ्या देखल लोकशाहीची हत्या होताना आपण पाहिली आहे. तेव्हा तेथील मराठी बांधव, तुमचा आणि माझा पाठिंबा मिळविण्यासाठी, तुम्ही आणि मी म्हणजे 10 कोटी महाराष्ट्राच्या जनतेचा आवाज त्यांच्या पाठीशी उभा राहील म्हणून येथे आला आहे. आज आम्ही येथे त्या विषयी चर्चा उपस्थित केली असता माननीय मुख्यमंत्री म्हणाले होते की, आम्ही यासाठी सुप्रीम कोर्टामध्ये जाऊ. पण तेथे जाऊन लौकर न्याय होईल असे मला वाटत नाही. तेथे वाद विवाद होणार आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... एफ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड...

अशावेळी मधला मार्ग काढून दोन्ही राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांची बैठक घेऊन, दोन-चार लोकांनी माननीय प्रतपंधानांची भेट घेऊन त्यांच्याकडे या प्रश्नासंबंधी मध्यस्थी करुन किंवा तीन महिन्यांच्या कालावधीसाठी सुप्रिम कोर्टाचा लवाद नेमून हा प्रश्न तडीस न्यावा अशी महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेच्या मनातील इच्छा आहे. अशाप्रकारे माननीय मुख्यमंत्र्यांनी आझाद मैदानामध्ये उन्हा-तान्हात बसलेल्या दोन हजार मराठी बांधवांची भेट घेऊन त्यांना सांगितले तर ते महत्वाचे ठरेल. तेव्हा आपण माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय उप मुख्यमंत्री यांना निदेश द्यावेत की, बेळगाव, कारवार, निपाणी, डांग व दीदर येथील मराठी बांधव आपल्या न्याय्य हक्कासाठी लढत आहेत त्यांच्या पाठीशी या महाराष्ट्रातील 10 कोटी जनता उभी आहे असे त्या ठिकाणी जाऊन सीमावासियांना सांगावे. अशाप्रकारचे चित्र निर्माण करण्यासाठी आपण त्यांना निदेश द्यावेत अशी विनंती करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्रातील जनतेच्या जिव्हाळयाच्या या प्रश्नाची गिनिज बुकामध्ये नोंद व्हावी इतका तो रेंगाळत राहण्याचे कर्तृत्व आघाडी सरकारचे आहे. सतत भळभळत रहाणाऱ्या अश्वत्थाम्याच्या जखमेप्रमाणे महाजन अहवाल स्वीकारला गेला पाहिजे अशाप्रकारचा आग्रह सतत धरला गेला. आणि दिल्लीच्या नियंत्रणाखाली सतत चालणारे सरकार राज्यामध्ये असतांना महाजन अहवाल स्वीकारला गेला पाहिजे अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई हे मुंबईमध्ये येणार होते, तेव्हा माननीय शिवसेना प्रमुखांच्या नेतृत्वाखाली त्यांची गाडी वाटेमध्ये अडवून कोणत्याही परिस्थितीत आम्ही महाजन अहवाल स्वीकारणार नाही अशाप्रकारचे निवेदन देण्याचे ठरविण्यात आले. त्यावेळी माहीम येथे आंदोलन करण्यासाठी हजारो शिवसैनिक आले होते. त्या आंदोलनामध्ये श्री. मोरारजी देसाई यांची गाडी अडविण्यासाठी जे दहा शिवसैनिक नेमण्यात आले होते, त्यांचा मी प्रमुख होतो. त्यावेळी आमचे गाडी अडविणारे जे पथक होते त्यामध्ये श्री. अशोक पेणकर हा शिवसैनिक होता. ज्यावेळी पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई यांची गाडी अडविण्यासाठी तो पुढे झाला त्यावेळी बेदरकारपणे पंतप्रधानांच्या गाडीने श्री. अशोक पेणकर याला फरफटत नेले. त्यामध्ये श्री. अशोक पेणकर याला आपला पाय गमवावा लागला. त्यानंतर पुढील चार दिवस मुंबईमध्ये "न भूतो न भविष्यती" अशी परिस्थिती निर्माण झाली. त्यामधून सीमा प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी शिवसैनिकांचे आंदोलन मुंबईमध्ये उभे राहिले. आणि अशाप्रकारे जागतिक स्तरावर एक भयंकर अशाप्रकारचे आंदोलन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

मुंबईने पाहिले. या सीमा प्रश्नासाठी शिवसेनेने 69 हुतात्मे दिले आहेत. या आंदोलनाचे उग्र स्वरुप पाहिल्यानंतर व महाजन अहवाल कायमचा गाडल्यानंतर तो महाजन अहवाल महाराष्ट्रावर लादला गेला पाहिजे अशी परिस्थिती पुन्हा निर्माण झाली नाही. कर्नाटकाच्या घशामध्ये असलेला प्रांत केंद्रशासित करा अशाप्रकारची महाराष्ट्राची मागणी ऐकली गेली नाही. त्याचबरोबर मराठी भाषेची गळचेपी करण्यात आली. माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी सांगितल्याप्रमाणे त्या प्रांतामध्ये असलेली बहुसंख्य 90 टक्के मराठी माणसे कमी कशी होतील हे उद्दिष्ठ शासकीय पातळीवर ठरविण्यात आले. सभापती महोदय, आपल्या निदेशाच्या संदर्भात आम्ही बोलणे गैर आहे. परंतु संपूर्ण महाराष्ट्र हा आमच्या सोबत आहे, आणि त्यामुळे बेळगाव, कारवार या सीमा भागामध्ये कुणी जबदरस्ती करुन मराठी भाषिकांची गळचेपी करीत असेल तर यापुढे ते सहन केले जाणार नाही असे त्या ठिकाणी जाऊन सांगण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, शिवसेना फक्त 69 बळी देऊन थांबलेली नाहीतर 1985 मध्ये त्यावेळचे मुंबईचे महापौर असतांना माननीय श्री. छगन भुजबळ यांनी बेळगावच्या भूमीमध्ये उतरुन आंदोलन केले. त्यावेळी शिवसेनेने केलेल्या प्रखर आंदोलनामध्ये शेकडो शिवसैनिक माननीय श्री. छगन भुजबळ यांच्यासमवेत होते. माननीय श्री. छगन भुजबळ हे स्वत: एक महिना कारावासामध्ये होते. अशा परिस्थितीत आमचे हक्क शाबित राहिले पाहिजेत म्हणून बेळगाव-कारवार येथील मराठी भाषिकांचा आवाज शिवसेना सातत्याने उठवीत राहिली. तेथील मराठी भाषिकांची गळचेपी होत असतांना सीमा प्रश्नाच्या संदर्भात सतत आवाज उठवीत राहिली. याचे कारण त्यावेळी शिवसैनिकांमध्ये या प्रश्नाच्या संदर्भामध्ये प्रखरपणे लढण्याची वृत्ती होती व आजही सतत लढत आहोत. अशाप्रकारे हा प्रश्न "वयम पंचम शतम" रेंगाळत पडला आहे. कोण काय करीत आहे याबाबत त्यांना दूषणे देण्याचा हा विषय नाही. परंतु आम्ही या प्रश्नावर एकत्र आहोत. माननीय मुख्यमंत्र्यांनी मागील अधिवेशनामध्ये या सदनामध्ये जे भाषण केले ते माननीय श्री. सरपोतदार साहेबांनी वाचून दाखविले. केंद्रामध्ये आपले सरकार आहे तरी या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी काही होत नाही, कोर्टामध्ये गेले तरी काही काही होणार नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.सरफरे..... 14:35

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु.....

महाराष्ट्र शासनाकडून कोर्टात याचिका दाखल केली गेलेली नाही. उलट कर्नाटक सरकारने याचिका दाखल केलेली आहे. विरोधी पक्ष नेते म्हणाले, त्याप्रमाणे 32 महिने झाले, महाराष्ट्र शासन या संदर्भात अजूनही याचिका दाखल करत नाही. मला एका गोष्टीचे नवल वाटते नव्हे शरम वाटते की, नर्मदा सरोवराच्या धरणाची उंची वाढविणार म्हटल्याबरोबर गुजरातमधील खासदार पक्षभेद विससून एकमेकांशी पाण्यात पहाणारे, समोर आले तर कापून काढू असे म्हणारे या विषयावर एक झाले आणि त्यांनी पंतप्रधानांवर दबाव आणला आणि तो निर्णय हाणून पाडला. काही तासामध्येच त्यांनी आपले सामर्थ्य पणाला लावले. तसे महाराष्ट्राच्या खासदारांनी या विषयावर एकत्र येऊन केंद्र सरकारला निर्णय करण्यासाठी भाग पाडावे. मला महाराष्ट्रातील खासदारांना आवाहन करावचाचे आहे की. गुजरातचे खासदार एकत्र येऊन पंतप्रधानांना नमवू शकतात, त्याप्रमाणे बेळगाव,कारवार प्रश्नासंबंधी ताबडतोबीने अफीडेव्हीट दाखल करावे अशाप्रकारची भूमिका घेऊन केंद्र सरकारवर दबाव आणावा, अशी या चर्चेच्या निमित्ताने त्यांना आवाहन करु इच्छितो. विधानपरिषद आणि विधानसभेच्या सन्माननीय सदस्यांनी बेळगाव, कारवारवासी मुंबइर्मध्ये मोठ्या आशेने आलेले आहेत, त्यांची भेट ध्यावी. आम्ही सकाळी त्यांची भेट घेऊन आलेलो आहोत. वयं,पंचम,शतम् अशाप्रकारे हा प्रश्न रेंगाळलेला आहे. बेळगाव, कारवारवासी उपोषणाला बसलेले आहेत, त्यांचे सामर्थ्य वाढविण्यासाठी सगळयांनी मिळून त्यांची भेट घ्यावी, अशी विनंती आहे. धन्यवाद.

---

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

श्री.जयंत प्र.पाटील : (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार साहेबांनी या ठिकाणी ठराव मांडलेला आहे,त्या ठरवाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. मी या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्य बोलले. त्याची मी पुनरावृत्ती करणार नाही. सभापती महोदय, सीमा भागातील मराठी जनतेचे हाल होत आहेत. त्या ठिकाणचा संपूर्ण कारभार कन्नडमध्ये चालतो. मराठी भाषिकांची संख्या असतानाही सातबाराचा उतारा तसेच ग्रामपंचायतीचे प्रोसिडिंगही कन्नड भाषेमध्ये लिहिले जाते, अशी त्या ठिकाणची भयानक परिस्थिती आहे. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी सांगितल्याप्रमाणे त्या भागामध्ये पध्दतशीरपणे कानडी भाषिक जनता कशी वाढेल, अशा पध्दतीने कर्नाटक सरकारने प्रयत्न सुरु केलेला आहे. या ठिकाणी जवळजवळ 50 वर्षे झालेली आहेत, सीमावासीय जनता महाराष्ट्राकडे वेगळया आशेने पहात आहे. 1 नोव्हेंबरला बेळगावमध्ये काळ दिन पाळला जातो. त्या दिवशी मी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होतो. त्या दिवशी हजारोंच्या संख्येने लोक बेळगावमध्ये जमा होत होते. पंरतु आता 40 ते 50 लोक जमतात. बेळगाव-कारवार येथील मराठी भाषिक जनता निराशेने डोळयात पाणी आणते आहे. सन्माननीय सदस्य श्री. सरपोतदार साहेबांनी सांगितली ती खरी गोष्ट आहे. मुख्यमंत्री महोदय येथे उपस्थित नाहीत. दोन्ही सभागृहाचे सदस्य मिळून बेळगाव-कारवारवासी आझ ाद मैदानावर उपोषणास बसलेले आहेत, ते आपल्या दारामध्ये आलेले आहेत, त्यांच्या मागे महाराष्ट्राची 10 कोटी जनता पाठीशी ठामपणाने उभी आहे असे सांगून त्यांना पाठिबा देऊ. तसेच या प्रश्नावर या सभागृहामध्ये चर्चा घडवून आणावी, अशी मी विनंती करतो.

---

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार साहेब यांनी आपल्या सभागृहामध्ये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा व्हावी म्हणून हा प्रस्ताव मांडलेला आहे. यावर अनेक सन्माननीय सदस्य बोलले, मी पुनरावृत्ती करणार नाही. माझी फक्त एकच विनंती आहे की, हा प्रश्न सोडविणे कोणाच्या हातात आहे ? मागच्यावेळेस या सभागृहामध्ये या विषयावर चर्चा झाली होती. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांकडे अशी मागणी केली होती की, कर्नाटकमध्ये कॉंग्रेसचे राज्य आहे आणि दिल्लीमध्ये देखील कॉंग्रेसचे राज्य आहे. त्यामुळे या संदर्भात कॉंग्रेस अध्यक्षा, श्रीमती सोनिया गांधींच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करावी. ही समिती जो निर्णय देईल, तो निश्चितपणे महाराष्ट्राला न्याय देणारा असेल...

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ......

आणि म्हणून त्यांची समिती नियुक्त करावी अशी मागणी त्यावेळी केली होती. आता आपण सुप्रीम कोर्टामध्ये केस दाखल केलेली आहे. कायदेशीर बाबतीत अशी परिस्थिती आहे की, कर्नाटक सरकारने आणि महाराष्ट्र सरकारने सुप्रीम कोर्टात आपले म्हणणे मांडलेले आहे परंतु केंद्र सरकार आपले म्हणणे सुप्रीम कोर्टात मांडत नाही म्हणून डेड-लॉक निर्माण झालेला आहे. यासंदर्भात माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, केंद्रातील सरकार हे तुमच्याच काँग्रेस पक्षाचे सरकार आहे. म्हणून आवश्यकता असेल तर या विषयावर माननीय मुख्यमंत्र्यांनी सर्वपक्षीय सन्माननीय सदस्यांना सोबत घेऊन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग साहेबांकडे नेऊन केंद्र सरकारने सुप्रीम कोर्टामध्ये आपली भूमिका मांडावी अशा प्रकारचा आग्रह धरण्याची आवश्यकता आहे. न्यायालयाच्या बाबतीत आपल्याला कोणतीही टिप्पणी करण्याचा अधिकार नाही. परंतु न्यायालयामध्ये एखादा खटला तुंबवून ठेवण्याच्या संदर्भात लोकशाहीची समज असणाऱ्या सर्वांनीच विचार केला पाहिजे. तुम्ही निर्णय प्रोलाँग करु शकत असाल, त्याबाबत स्थगिती देऊ शकत असाल तर लोकांनी किती काळ, किती पिढ्या वाट पहावी यालाही काही मर्यादा आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी सांगितले की, तेथील सरपंच मराठी भाषिक आहेत आणि त्यांना कन्नड भाषेमध्ये सातबाराचा उतारा दिला जातो. त्यांना कन्नड भाषेमध्ये सही करावी लागते. सोलापूर भागामध्ये अशी परिस्थिती आहे की, त्या ठिकाणी सरपंच कन्नड भाषिक आहेत आणि सातबारा मराठीतून द्यावा लागतो. याबाबतीत काही तरी निकष मान्य करावा लागेल. ते निकष कोणते राहतील याबाबतीतील निर्णय राज्य सरकारने घेतला पाहिजे. महाजन आयोगाच्या अहवालानंतर वाद निर्माण झाला. तो अहवाल एकतर्फी होता. महाराष्ट्राबरोबर न्याय झाला पाहिजे, महाराष्ट्राच्या लोकांबरोबर न्याय झाला पाहिजे. म्हणून माझी विनंती आहे की, आपण सरकारला निदेश द्यावेत की, यासंदर्भात केंद्र सरकारने आपली भूमिका सुप्रीम कोर्टात ताबडतोब मांडण्याच्या दृष्टीने माननीय मुख्यमंत्र्यांनी निश्चितपणे माननीय पंतप्रधानांकडे सर्वपक्षीय शिष्टमंडळ नेऊन याकरिता ताबडतोब प्रयत्न करावा. असे निदेश आपण द्यावेत आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी ते मान्य करावे अशी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2...

RDB/ MHM/ KGS/

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी विनंती आहे. सीमा भागातील लोक आझाद मैदानामध्ये बसलेले आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी सर्व विरोधी पक्षनेत्यांना बरोबर घेऊन, आपण त्यांच्या मागे आहोत असा मेजेस त्यांना देण्याकरिता, त्या ठिकाणी एकत्रितपणे गेले पाहिजे. सरकारने ही सूचना स्वीकारावी अशी विनंती करतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना मी विचारु इच्छितो की, आपल्याला पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशन उपस्थित करावयाचा आहे की, आपल्याला या विषयाच्या संदर्भात बोलावयाचे आहे ?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मला या विषयावर बोलावयाचे देखील आहे. सभापती महोदय, मला जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्यानुसार या विषयावर विधानसभा सभागृहामध्ये सुध्दा चर्चा झाली आणि चर्चा झाल्यानंतर सर्व सन्माननीय सदस्य बेळगाव-कारवार सीमा भागातील जे लोक आझाद मैदानमध्ये बसलेले आहेत त्यांना भेटावयास जाणार आहेत. विधानसभेचे कामकाज संपूर्ण दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलेले आहे. हा प्रश्न अत्यंत जिव्हाळ्याचा आणि महत्वाचा आहे. या विषयाच्या संदर्भात या सभागृहामध्ये अगोदर सुध्दा चर्चा झ ाालेली आहे. माझी सुध्दा आपल्याला विनंती आहे की, ज्या सन्माननीय सदस्यांना यासंदर्भात बोलावयाचे आहे...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांच्या सूचनेशी मी सहमत आहे परंतु विधानसभा सभागृहामध्ये काय झाले त्याच्या आधारावर या सभागृहामध्ये निर्णय होऊ नये. सन्माननीय सदस्य थोडी घाई करीत आहेत. हे सार्वभौम सभागृह आहे. विधानसभा सभागृहातील निर्णयाचा, त्या सभागृहातील चर्चेचा या सभागृहाशी संबंध नाही.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : मी स्वतंत्रपणे माननीय सभापतींना विनंती करीत आहे.

श्री. नितीन गडकरी : माझी विनंती आहे की, या विषयावर सरकारला भूमिका जाहीर करु द्यावी.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जो पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशन उपस्थित केलेला आहे त्याबाबतचा निर्णय मी नंतर देतो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर तसेच कोकणवासीयांचा हा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. सिंधुदुर्ग जिल्हा हा विशेषत: बेळगाव आणि बाजूबाजूच्या परिसराला लागून आहे. त्या ठिकाणी बेळगावला मोठ्या प्रमाणावर रोटीबेटीचे व्यवहार होतात. संपूर्ण ब्रिटीशकालीन व्यवस्था पाहिली तर

यानंतर श्री. कानडे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ....

सभापती महोदय, मराठा इन्फंट्रीचे मुख्यालय सुध्दा त्यावेळी बेळगांवला होते. सावंतवाडी संस्थानसाठी पर्यायी व्यवस्था म्हणून बेळगांवला या संस्थानचे कार्यालय होते. गेल्या वेळी या सदनामध्ये या विषयावर चर्चा करताना मी म्हणालो होतो की, हुतात्मा दिनानिमित्त मी बेळगांवला गेलो असताना त्याठिकाणी एक जबरदस्त अशी सभा झाली आणि त्या सभेमध्ये या सदनाचा प्रतिनिधी म्हणून आणि एका राजकीय पक्षाचा कार्यकर्ता म्हणून मी सांगितले होते की, तुमच्या या लढयात महाराष्ट्रातील जनतेची तुम्हांला पूर्णपणे साथ आहे. आता अशा प्रकारची साथ देण्यासाठी हीच वेळ आलेली आहे. महाराष्ट्रातून मुंबईमध्ये जी मंडळी आलेली आहे त्यांना भेटण्यासाठी आपण सर्वांना जाऊ या यासाठी सभापती महोदयांनी निर्णय घ्यावा अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, क्लेशदायक आणि वेदना देणारा असा हा प्रस्ताव आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नावर चर्चा घ्यावी यासंबंधी जो प्रस्ताव मांडला आहे त्याचे समर्थन करताना मी एवढेच म्हणेन की, आता हा प्रश्न सुटावा म्हणून तिसरी पिढी जळते आहे.

साईनाथ ठाकूर आणि बाबा ठाकूर यांचे केस पांढरे झाले. तरीही या लोकांना न्याय मिळाला नाही म्हणून हा प्रस्ताव मांडला आहे. माझ्या दृष्टीने एकच महत्वाचा मुद्दा आहे आणि तेवढाच मी मांडणार आहे. एका बाजूला शासन म्हणते आहे की आता हा प्रश्न कोर्टात गेला आहे आणि दुसऱ्या बाजूला दिल्लीमध्ये आज अशी परिस्थिती आहे की केवळ राज्यातील 48 खासदारच नव्हे तर महाराष्ट्राचे 10 मंत्री केंद्र सरकारमध्ये बसलेले आहेत. तरीही हा प्रश्न सुटत नाही. कर्नाटकाची बाजू मांडताना एक एक इंच जमीन आम्ही देणार नाही असे तेथील मुख्यमंत्री सांगत होते तेच आमच्या राज्यावर लादले गेले. याही परिस्थितीमध्ये केंद्रामध्ये जेव्हा जेव्हा कर्नाटक सीमा प्रश्न मांडला गेला त्यावेळी कर्नाटकचे सरकार मग त्यांचा आंध्र प्रदेशबरोबर झगडा असो किंवा केरळ बरोबर असो किंवा तामिळनाडू बरोबर असो एकजुटीने उभे राहिले आहे न्याय पदरात पाडून घेतला आहे. अशी एकजूट महाराष्ट्राने सुध्दा दाखवावी. सुप्रीम कोर्टाने ऑगस्ट 2005 मध्ये या प्रश्नाबाबत केंद्र सरकारला कळविले आहे. सर्वोच्च न्यायालयाने केंद्र शासनाला या विषयासंदर्भात असे कळविले आहे की, केंद्र सरकारने चार आठवडयांच्या आत आपले म्हणणे कोर्टासमोर मांडावे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ऑगस्ट 2005 मध्ये कोर्टाने आदेश दिले आणि आता ऑगस्ट 2006 मध्ये या प्रश्नाची सुनावणी सुरु होईल तरीही केंद्र सरकारने आपले म्हणणे कोर्टापुढे सादर केलेले नाही. केंद्र सरकारचे जे म्हणणे आहे ते गृहमंत्रालयाने कोर्टापुढे सादर करावयाचे आहे. केंद्र शासनातील गृहमंत्री या राज्याचे आहेत आणि तरी सुध्दा या सीमा प्रश्नासंबंधी केंद्र सरकारचे म्हणणे कोर्टापुढे सादर झ ालेले नाही. म्हणून सदनामध्ये हा प्रस्ताव चर्चेसाठी आलेला आहे. याठिकाणी शेवटी मी एकच गोष्ट सांगतो की, 105 हुतात्म्यांचे बलिदान झाल्यानंतर सुध्दा पुन्हा पुन्हा रक्त सांडण्याची वाट पाहणार आहात काय ? ज्या पध्दतीने प्रश्न मांडला आहे त्याला महाराष्ट्रातील सर्वांची साथ आहे. आम्ही मुंबईला आलो आहोत आमच्याबरोबर तुम्हीही या असे या लोकांचे म्हणणे आहे. या लोकांना पाठिंबा देण्यासाठी सभागृहाचे आजचे कामकाज येथेच तहकूब करावे आणि सन्माननीय मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेते यांच्या नेतृत्वाखाली सर्वांनीच या आंदोलनकर्त्यांना पाठिंबा द्यावा अशी मी विनंती करतो. बेळगांव,कारवार आणि निपाणी या भागातील लोकांना आपण सांगू या की, सारा महाराष्ट्र तुमच्या पाठिशी उभा आहे. म्हणून सभागृहाचे आजचे कामकाज तहकूब करावे अशी मी आपणांस विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत जे उद्‌गार काढले आहेत ते रेकॉर्डवरुन काढून टाकावेत अशी मी आपणांस विनंती करतो.

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी राज्यपाल महोदयांच्या बाबतीत जे उद्‌गार काढले आहेत ते मी तपासून घेतो आणि कामकाजातून काढून टाकतो.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी जो विषय सभागृहात उपस्थित केला आणि सूचना केली आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. बेळगांव,निपाणी आणि कारवारसह संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे ही महाराष्ट्रातील तमाम जनतेची मागणी होती. परंतु बेळगांव,निपाणी आणि कारवार वगळून महाराष्ट्र निर्माण झाला.

यानंतर श्री. भारवि ...

अप्रमाणित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

याला आपण संयुक्त महाराष्ट्र म्हणावयाचे की, अर्धवट महाराष्ट्र म्हणावयाचे हेच मला कळत नाही. अर्धवट महाराष्ट्र पूर्ण करावयाचा असेल तर बेळगाव, कारवार, निपाणीसह मराठी भाषिक प्रदेशांचा आपल्या महाराष्ट्रामध्ये समावेश करणे नितांत आवश्यक आहे. यासंबंधी वारंवार आंदोलने झाली, मराठी माणसांनी रक्त सांडविले, हुतात्मा झाले. एवढे होऊन देखील हा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. सन्माननीय महामहीम राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणामध्ये बेळगाव, कारवार, निपाणी हा प्रदेश महाराष्ट्रामध्ये यावा यासाठी कायदेशीररित्या कोर्टामध्ये कारवाई करणार आहेत,असा उल्लेख केला आहे. पण कोर्टामध्ये निकाल लागण्यासाठी किती विलंब लागत आहे, हे सर्वांना माहीत आहे. जस्टीस डिलेड, इज जस्टीज डिनाईड या दृष्टिकोनातून त्याकडे न बघता खऱ्या अर्थाने बेळगाव, निपाणी, कारवारसह संयुक्त महाराष्ट्र कसा होईल हे पाहणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, बेळगाव, निपाणी, कारवार या भागामध्ये राहणाऱ्या मराठी जनतेवर कर्नाटक सरकारच्यावतीने आतंकवाद निर्माण केला जात आहे. बेळगावच्या महापौरांना मारहाण करणे, त्यांच्या तोंडाला काळे फासणे म्हणजे मराठी माणसाच्या, महाराष्ट्राच्या जनतेला काळे फासणे असा हा घोर प्रकार आहे. तेव्हा या संदर्भात माझी विनंती आहे की, दिल्लीमध्ये कुणाचे सरकार यात न जाता हा प्रश्न मराठीच्या अस्मितेचा आहे, असे समजून सर्वांनी पाठिंबा दिला पाहिजे. भाषावार प्रांत रचनेनुसार मराठी भाषिक प्रदेश आपल्या राज्यात यावा अशी आमची रास्त न्याय्य मागणी आहे. अनेक वर्षापासून कुजत ठेवलेला महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न लवकर सुटावा यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी पक्षभेद विसरून बेळगाव, कारवार, निपाणी या मराठी भागाचा संयुक्त महाराष्ट्रामध्ये समावेश व्हावा, या मागणीसाठी कर्नाटक राज्यातील मराठी भाषिक भागातील प्रदेशातील जे लोक आज आझाद मैदान येथे बसले आहेत, त्या सर्वांना आपण भेटायला जाणे आवश्यक आहे. त्यांना दिलासा देणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये बेळगाव, निपाणी, कारवार संयुक्त महाराष्ट्रामध्ये आल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही असा संकल्प, प्रतिज्ञा आपण सर्वांनी मिळून घेतली



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

पाहिजे. आझाद मैदान येथे बसलेल्या लोकांना भेटायला आपण गेलो तर त्यांना दिलासा मिळेल, त्यांच्यामध्ये आत्मविश्वासाची भावना निर्माण होईल. तेव्हा बेळगाव, कारवार, निपाणी हा भाग महाराष्ट्रामध्ये येण्यासाठी जे मराठी भाषिक बांधव आझाद मैदान येथे बसले आहेत, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण आझाद मैदान येथे सर्वजण मिळून भेटायला जाऊ या. धन्यवाद.

.....

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार (विधानसभेद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, अत्यंत महत्त्वाच्या अशा एका प्रश्नावर या सदनामध्ये चर्चा सुरू आहे. महाराष्ट्राच्या उदारमतवादाचा इतका अतिरेक झाला आहे की, सीमा प्रदेशातील संपूर्ण मतदारांचा, मराठी भाषिक जनतेचा लोकशाहीवरचा विश्वास उडून जावा अशी दुर्दैवी अवस्था त्या भागात झालेली आहे. लोकशाहीवरचा विश्वास उडाल्यानंतर लोक कोणत्या मार्गाने जातील हे सांगाता येणार नाही. त्याचे विदारक सत्य आज अनेक ठिकाणी पाहात आहोत. गेल्या 40-45 वर्षापासून कारवार, निपाणी,बेळगाव येथील जनता महाराष्ट्रामध्ये सामील होण्याची मागणी करीत आहे. एवढचे नव्हे तर सन 1946 मध्ये झालेल्या साहित्य संमेलनामध्ये कै.माडगूळकर यांनी संयुक्त महाराष्ट्रामध्ये कर्नाटक सीमेवरील गावे महाराष्ट्रात समाविष्ट झाली पाहिजे असा प्रस्ताव मांडला होता. बेळगाव, कारवार, निपाणी, तसेच बैतुल, बुऱ्हानपूर, छिंदवाडा हे मराठी भाषिक प्रदेश आपल्या राज्यातून बाहेर पडले आहेत. बेळगाव, कारवार, निपाणी या प्रदेशांबरोबरच बैतुल, बुऱ्हानपूर, छिंदवाडा हे मराठी भाषिक प्रदेशसुध्दा महाराष्ट्रात आला पाहिजेत. कर्नाटक राज्यातील मराठी जनतेवर अन्याय केला जातो असा उल्लेख माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी केला आहे. बेळगाव महानगरपालिकेतील मराठी महापौरांना केलेली मारहाण, मराठी सदस्यांना दिलेली वागणूक, 7/12 उतारा देण्यासंबंधीचा देखील येथे उल्लेख करण्यात आला आहे. महाराष्ट्राने अत्यंत उदारमतवाद स्वीकारल्यामुळे महाराष्ट्रात कन्नड, गुजराती, बंगाली व अन्य भाषिक लोकांना समान वागणूक दिली जाते. मात्र, कर्नाटकमध्ये राहणाऱ्या मराठी भाषिकांवर अन्याय केला जातो. तो लवकरात लवकर दूर करण्यासाठी आज आझाद मैदान येथे श्री.किरण ठाकूर आणि अन्य जी मंडळी बसली आहेत, त्यांना भेटावयास गेले पाहिजे अशी सर्वांनी सूचना केली आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार....

सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी सांगितल्यानुसार आता त्यांच्या तिसऱ्या पिढीमुळे मग त्यामध्ये साईनाथ ठाकूर असोत, बाबूराव ठाकूर असोत, परशुराम निंदे असोत यांची नावे ऐकावयास मिळत नाहीत. अशी अवस्था आज दुर्दैवाने निर्माण झालेली आहे. कारवारचे श्री.कदम यांनी निवडणुका लढविल्या. परंतु आता ती माणसे थकून गेली आहेत. त्यामुळे त्या सीमावासीयांना न्याय मिळवून देण्यासाठी, हे सभागृह स्थगित करावे आणि आझाद मैदानावरील लोकांना सामोरे जावे अशी मी विनंती करतो. एवढेच नव्हे तर महाराष्ट्राच्या एकमुखी भावना दिल्लीपर्यंत पोहोचवाव्यात अशी माझी या सदनाला या चर्चेच्या निमित्ताने विनंती आहे.

---------

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, गेले 44 वर्षे सीमा प्रश्न भिजत पडला आहे. वेळोवेळी एखादी घटना घडते आणि ती घटना घडल्यानंतर पुन्हा एकदा भावनांचा उद्रेक होतो. काही काळ आंदोलन केले जाते आणि काही काळातच ते थंडावले जाते. बेळगाव येथील महापौरांच्या तोंडाला काळे फासल्यानंतर जो उद्रेक झाला त्याचे पडसाद महाराष्ट्रभर उमटले. परंतु खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील जनतेने, महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्वाने त्याची गंभीर दखल घेतली नाही.

पुणे येथे एस.एम.जोशी यांच्या जन्म दिवसाच्या कार्यक्रमाच्या वेळी मुंबई शहरामध्ये धरणे आंदोलन धरण्याबाबतचा निर्णय झाला आणि आज आझाद मैदानावर त्या परिसरातून सीमावासी बंधू-भगिनी मोठया प्रमाणावर आलेले आहेत. मी सकाळी त्या धरणे-आंदोलनाला भेट देऊन आलो आहे. या ठिकाणी सुध्दा सर्वच सन्माननीय सदस्यांनी आझाद मैदानावर जाऊन सीमावासीयांना भेट द्यावी अशा प्रकारच्या भावना व्यक्त केल्या आहेत. सीमावासीयांची मागणी अशी आहे की, सीमा प्रश्न हा केवळ सीमावासीयांचा नसून, संपूर्ण महाराष्ट्राचा आहे असे समजून कृती करण्यात यावी. विधानमंडळाच्या सदस्यांनी एकत्रितपणे पक्षभेद विसरुन, दिल्लीला जावे आणि दिल्ली सरकार पुढे आंदोलन करावे. तसेच केंद्र सरकारने सीमा प्रश्नासंबंधी कोर्टामध्ये आपला अहवाल सादर करावा अशा प्रकारची मागणी करावी. केंद्र सरकारमध्ये असलेल्या महाराष्ट्रातील मंत्री महोदयांना साकडे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील....

घालून, केंद्र सरकारचे म्हणणे सुप्रीम कोर्टामध्ये त्वरित दाखल करण्यात यावे अशी अपेक्षा सीमावासीयांनी व्यक्त केली आहे. मी या निमित्ताने विनंती करीत आहे की, विधानमंडळाच्या सर्व सदस्यांनी दिल्लीला जाऊन, केंद्र सरकारसमोर या संदर्भात आग्रह धरावा. त्यामुळे आज सीमा प्रश्नाच्या बाबतीत सभागृहाचे कामकाज तहकूब करावे आणि सर्वांनी आझाद मैदान येथील सीमा भागातील वासियांच्या भावनांना सहमती व्यक्त करुन, त्यांना पाठिंबा दर्शवावा एवढेच या निमित्ताने सुचवितो.

---------

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, सीमा प्रश्न हा गेल्या अनेक वर्षांपासून सर्वांच्या अस्मितेचा प्रश्न झाला आहे. खऱ्या अर्थाने मराठी माणसाला, मराठी भाषेला अस्मिता उपलब्ध करुन द्यावयाची असेल तर हा प्रश्न लवकरात लवकर सुटला पाहिजे. या प्रश्नामध्ये कोणत्याही प्रकारचे राजकारण किंवा वेगळे मत असता कामा नये असे मला वाटते. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना सांगू इच्छितो की, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी या विषयी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. आपल्या भावना व्यक्त करीत असताना, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी असे सांगितले की, केंद्रामध्ये काँग्रेस पक्षाचे सरकार आहे, केंद्रातील मंत्र्यांना जाऊन आपण या बाबत सांगावे. मला वाटते की, आपल्या सर्वांना माहीत आहे की, यापूर्वी केंद्रामध्ये शिवसेना-भाजपा प्रणित सरकार होते.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSK/ MHM/ SBT/ KGS/ MAP यापूर्वी श्री. बोर्डे .. 15.00

श्री. सुधाकर गणगणे ....

या राज्यामध्येही होते. त्यावेळी देखील हा प्रश्न त्यांनी लावून धरला होता. आजच्या या परिस्थितीला .....

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करत असतात. )

श्री. दिवाकर रावते : आम्ही झक मारली म्हणून तुम्ही का मारता ?

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, काँग्रेसने यापूर्वीही या विषयी सभागृहात आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे. राज्यातील माननीय मुख्यमंत्र्यांनीही या संदर्भातील भूमिका स्पष्ट केलेली आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणेजी आपण खाली बसावे. आता सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी आपले विचार व्यक्त करावेत.

----

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, नागपूरमधील त्या काळचे ज्येष्ठ संपादक श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांनी तयार केलेला महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचा प्रस्ताव सर्वप्रथम बेळगांव शहरामध्ये मंजूर झाला होता. परंतु तरीही 40-50 वर्षे उलटून गेलेली असताना देखील या स्थितीला तोंड द्यावे लगात आहे, ही लोकशाहीमध्ये जखम करणारी स्थिती आहे. सभापती महोदय, पदतोव्याघाचे असे सुंदर उदाहरण आपणास शोधूनही सापडणार नाही. या संदर्भात लोकांनी आपली इच्छा व्यक्त करुनही लोकशाहीमध्ये त्यांना न्याय मिळत नाही, असे उदाहरण स्वतंत्र भारतामध्ये शोधूनही सापडणार नाही. सभापती महोदय, स्वातंत्र्याच्या आधारावर असलेली दमनशक्ती या शहराने आता प्रभावी केलेली आहे. सभापती महोदय, मी आपल्याला जगाचा इतिहास सांगतो की, एखादी राजसत्ता विरोधात गेली की राज्यात ॲडॉप्शन आणि समायोजनेला सुरुवात होते. परंतु आज ती भावना का राहिलेली नाही ? या ठिकाणी छिंदवाड्याचा कोणीतरी उल्लेख केला. सभापती महोदय, मी या संदर्भात आपणास असे सांगू इच्छितो की, तेथील लोक आता हे सर्व विसरुन गेले आहेत. परंतु बँगलोरला महाराष्ट्र एकीकरण समितीच्या महापौरांसंदर्भात घडलेल्या गोष्टीचाही विचार करावा लागेल. असेच जर प्रकार होत असतील तर

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख ....

लोकशाहीमध्ये काय करायचे ? त्या भागात 50 वर्षांपासून भाषा, संस्कृती, चालीरिती, शिक्षण यांचे खच्चीकरण करण्यात येत आहे. परंतु या विरोधात तेथील मंडळी ठामपणे उभी आहेत. ती मंडळी आज येथे येऊन मागणी करत आहेत की, महाराष्ट्राच्या निर्मितीचा प्रस्ताव ज्या बेळगांव शहरामध्ये मंजूर झाला होता, त्या शहराची आज स्थिती काय आहे ? सभापती महोदय, या प्रकरणी सीमावासियांना पाठिंबा देत असताना त्यांना सर्वांनी भेटून दिलासा दिला पाहिजे, एवढ्याच या निमित्ताने मी भावना व्यक्त करतो.

----

श्री. यशवंतराव गडाख : सभापती महोदय, गेली 40-50 वर्षे आपण हा सीमा प्रश्न पाहिला. आता या प्रश्नाचा चावून चोथा झालेला आहे. सर्व राजकीय पक्षांनी त्या वेळेला या संदर्भात आंदोलने केली. सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख म्हणत आहेत त्याप्रमाणे लोकशाहीमध्ये अशा प्रकारचे आपल्याला दुसरे उदाहरण मिळणार नाही. सभापती महोदय, भाषा हे समाज व संस्कृती फुलविण्याचे एक माध्यम आहे. दुसऱ्या कोणत्याही प्रश्नाची गळचेपी चालेल परंतु भाषेची होणारी गळचेपी ही किती क्लेषदायक असू शकते, हे तेथील लोकांची परिस्थिती पाहिल्यावर आपल्याला दिसेल. सभापती महोदय, अहमदनगर येथे 17 वे मराठी साहित्य संमेलन भरले होते. त्या कार्यक्रमाला दीड ते दोन लाख लोक आले होते. त्यावेळी बासु भट्टाचार्य यांनी भाषण केले होते. सभापती महोदय, त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, मी बंगाली आहे. बंगालमध्ये बंगलीमध्येच बोलावे लागते. फक्त महाराष्ट्र हे एकच राज्य असे आहे की, या राज्यामध्ये इतर प्रांतीय येऊन मनाप्रमाणे बोलू शकतात, वागू शकतात, जगू शकतात. सभापती महोदय, जर आपल्या सर्वांच्या मुलांना कन्नडमध्ये शिकविले पाहिजे असे सांगितले तर आपली काय गत होईल ? सभापती महोदय, आपली प्रगती भाषेच्या माध्यमातूनच होते.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख...

ही गळचेपी थांबविण्यासाठी सर्व सदस्यांनी यामध्ये सहभागी असावयास पाहिजे. यामध्ये राजकीय इच्छाशक्ती कीती आहे, सर्व पक्षांच्या प्रमुखांनी या सीमाप्रश्नांचा विचार करावयास पाहिजे. या प्रश्नांच्या निमित्ताने सर्व पक्षप्रमुखांची इच्छाशक्ती व त्यांची जबाबदारी ते कशा रीतीने पार पाडतात यावर तेथील मराठी भाषिकांचे भवितव्य अवलंबून आहे. त्यासाठी जे जे करावे लागेल ते करण्याकरिता सर्व पक्ष प्रमुखांनी यामध्ये सहभागी होऊन त्यांना निश्चितपणे पाठींबा दिला पाहिजे, एवढे बोलून मी माझे भाषण थांबवितो.

---------------

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (विधानसभेने निवडलेले) : आज या देशामध्ये महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न अत्यंत जिव्हाळयाचा व ज्वलंत असा झालेला आहे. त्या प्रश्नावर आज सभागृहात चर्चा चाललेली आहे. खरे तर गेल्या 40 ते 50 वर्षापासून महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नाचे भिजत घोंगडे पडलेले आहे. त्या प्रश्नांची आता दुर्गंधी पसरु लागली आहे. याच कारणासाठी बेळगावच्या महापौरांच्या तोंडाला काळे फासण्यात आलेले आहे. लोकशाहीचा गळा घोटण्याची ही दुर्देवी घटना घडलेली आहे. आज तेथील मराठी लोकांची गळचेपी होत आहे. विधानसभेमध्ये निवडून आलेल्या सदस्यांना मराठी मध्ये किंवा हिंदीमध्ये भाषण करु दिले जात नाही. मराठी भाषिक सदस्य निवडून गेला तरी त्या सदस्यांना मराठीमध्ये बोलू देत नाहीत, त्यांना कन्नड भाषेमध्ये बोलण्याची सक्ती करण्यात येते. मराठी भाषिकांना शासकीय नोकऱ्या मिळत नाहीत, त्यांना जर नोकरी मिळाली तर त्यांची बदली 200 ते 300 किलोमीटर लांब करण्यात येते, कारण तेथे कन्नड भाषिक असतात, त्यामुळे दुर्देवाने त्यांना नोकरी सोडावी लागते. सदर मराठी भाषिकांवर कन्नड भाषिकांकडून मोठया प्रमाणावर अन्याय करण्यात येत आहेत. मराठी भाषिकांच्या मुलीने जर एखाद्या कन्नड भाषिकाशी प्रेमविवाह केला तर तेथील मराठी भाषिक मुलीला घरामध्ये फार मोठया प्रमाणात त्रास दिला जातो. आम्ही दोन महिन्यापूर्वी त्या भागामध्ये गेलो होतो, त्या भागात कन्नडभाषेमध्येच बोलले पाहिजे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा परिसरातील 22 खेडयांकडे सरकारकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे. अनेक सदस्यांनी बरेच विषय येथे मांडलेले आहेत. सुदैवाने महाराष्ट्रातील गृहमंत्री केंद्रामध्ये आहेत, यासंदर्भात सुप्रीम कोर्टात जो अहवाल द्यावयाचा आहे त्यामध्ये मराठी भाषिकांचा सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा यासाठी सर्वपक्षीय लोकांनी त्यांच्यापाठीमागे उभे राहिले पाहिजे त्यासाठी आजचे सभागृहाचे कामकाज स्थगित करुन त्यांना साथ दिली पाहिजे, एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, सदनाच्या दोन्ही बाजूकडील सदस्यांची भाषणे ऐकल्यानंतर तसेच खालच्या सभागृहातील सदस्यांची भाषणे ऐकल्यानंतर याबाबत सर्वपक्षीय सदस्यांचे एकमत झालेले आहे. कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्राला नेहमीच दुय्यमपणाची वागणूक देशपातळीवरुन देण्यात आलेली आहे. भाषावार प्रांतरचना करीत असतांना देशातील सर्व राज्यांना न्याय दिला जातो, परंतु महाराष्ट्राला न्याय मिळण्यासाठी 105 हुतात्म्यांचे बलिदान द्यावे लागले आहे. बेळगांव कारवार परिसरातील लोक गेल्या 40 ते 45 वर्षे सातत्याने संयम ठेऊन, लाठयाकाठया खाऊत प्रतिकूल परिस्थितीमध्ये आपल्या हक्कासाठी ते लढत आहेत. आज त्यांचे काही प्रतिनिधी मुंबईमध्ये धरणे आंदोलन करीत आहेत, या प्रसंगी महाराष्ट्रातील 10 कोटी जनता त्यांच्या बरोबर आहे हा संदेश देण्यासाठी तसेच सुप्रीम कोर्टाने केंद्र सरकारकडून अहवाल मागविला आहे. ही केस ऑगस्ट महिन्यात बोर्डावर येईल. केंद्र सरकारने आपले अभिप्राय सुप्रिम कोर्टामध्ये दिले पाहिजे, याकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी खालच्या सदनाने एकमताने ठराव संमत केला असून सदनाचे कामकाज आजच्या संपूर्ण दिवसासाठी तहकूब करण्याचा निर्णय घेतला आहे. ते सर्व सदस्य शिष्टमंडळाला भेटण्यासाठी जात आहेत. म्हणून मी आपणाला विनंती करीन की, खालच्या सदनाचे व वरच्या सदनाचे सन्माननीय सदस्य एकाचवेळी आपल्या अध्यक्षतेखाली शिष्टमंडळाला भेटण्यासाठी जावेत यासाठी आजच्या दिवसाचे कामकाज तहकूब करावे असा प्रस्ताव मी शासनाच्यावतीने मांडत आहे.

--------------

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील मुलींचा घटणारा जन्मदर या विषयासंबंधी आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेबाबत माननीय सभापतींनी केलेली घोषणा**

**सभापती** : राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेच्या विद्यमाने "पॉप्युलेशन फाऊंडेशन ऑफ इंडिया" या अशासकीय संस्थेच्या सहकार्याने राज्यातील मुलींचा घटणारा जन्मदर याबाबत मंगळवार, दि.18 एप्रिल, 2006 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 11.30 या वेळेत मध्यवर्ती सभागृह, 4था मजला, विधानभवन, मुंबई येथे एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

सदर कार्यशाळेचे उद्‌घाटन माननीय मुख्यमंत्री यांचे हस्ते होणार आहे. यासंबंधीची निमंत्रणपत्रिका सर्व सन्माननीय सदस्यांना वितरित करण्यात आली आहे. तरी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी उद्‌घाटन सोहळ्यास तसेच कार्यशाळेस उपस्थित रहावे.

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्याबाबत

**सभापती** : माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर. पाटील यांनी या सभागृहामध्ये प्रस्ताव मांडलेला आहे त्या अगोदर सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी महाराष्ट्र, कर्नाटक सीमाप्रश्नाच्या अनुषंगाने आज आझाद मैदान येथे उपोषणास बसलेल्या सीमा भागातील मराठी भाषिक बांधवांना भेटायला जाण्याची आवश्यकता असल्याचे विचार मांडले आहेत. या बाबतीत सदनातील दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांनी आपापले विचार व्यक्त करुन महाराष्ट्र, कर्नाटक सीमाप्रश्न तातडीने सुटावा यासाठी आझाद मैदानावर सीमा भागातून आलेल्या मराठी भाषिक बांधवांना एकमुखाने पाठिंबा दिलेला आहे. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी अशी विनंती केली आहे की, संपूर्ण राज्याच्या दृष्टीने हा अतिशय जिव्हाळयाचा प्रश्न असल्यामुळे आझाद मैदानावर उपोषणास बसलेल्या सीमा भागातील मराठी बांधवांना आपला पाठिंबा दर्शवण्यासाठी माझ्यासह सर्व सन्माननीय सदस्यांनी त्यांना प्रत्यक्ष भेटण्यासाठी आज दुपारी 4.00 वाजता आझाद मैदान येथे जायचे आहे. त्या ठिकाणी सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांसमवेत माननीय उपमुख्यमंत्री देखील उपस्थित राहतील. सीमाप्रश्नाला पाठिंबा देण्यासाठी आझाद मैदान येथे आपण सर्वांनी उपस्थित रहावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्नासंबंधी सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिकेसंदर्भात केंद्र शासनाने त्यांचे म्हणणे ऑगस्ट, 2006 पूर्वी माननीय सर्वोच्च न्यायालयात मांडावे अशी शिफारस केंद्र शासनाकडे करण्याचा ठराव एकमताने मान्य करण्यास आपण सर्वांनी संमती द्यावी.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या निर्णयास सहमती दर्शवितात.)

मी आता सभागृहाची बैठक तहकूब करतो. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन मंगळवार, दिनांक 18 एप्रिल, 2006 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 13 मिनिटांनी, मंगळवार दिनांक 18 एप्रिल, 2006 च्या दुपारी 1.00 पर्यंत स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही